भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**आरबीआय/२०१२-१३/४१**
**डीबीओडी. बीपी.बीसी. क्र. १४/२१-०४.०१८/२०१२-१३** **दिः जुलै २, २०१२**

अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व अनुसुचित वाणिज्य बँका (आरआरबी सोडुन)

महोदय,

**महापरिपत्रक - वित्तीय - विवरणपत्रातील प्रकटीकरण - नोट्स टु अकाउंटस**

कृपया, ''नोट्स टु अकाऊंट्स'' मधील वित्तीय विवरण पत्रातील प्रकटीकरणासंबंधीच्या बाबींविषयी, बँकांना, जून ३०, २०११ पर्यंत दिल्या गेलेल्या सर्व कार्यकारी सूचना एकत्रित केलेले आमचे महापरिपत्रक डीबीओडी बीपी.बीसी.क्र. १६/२१.०४.०१८/२०११-१२ दि. जुलै १, २०११ चा संदर्भ घ्यावा. हे महापरिपत्रक आता जून ३०, २०१२ पर्यंत दिलेल्या सूचना समाविष्ट करुन अद्यावत करण्यात आले असून रिझर्व बँकेच्या वेबसाईटवरही (www.rbi.org.in) टाकण्यात आले आहे.

२. कृपया नोंद घ्यावी की, परिशिष्टामध्ये दिलेल्या परिपत्रकांमधील, वरील विषयावरील असलेल्या सर्व संबंधित सूचना ह्यात एकत्रित करण्यात आल्या आहेत. ह्याशिवाय, ''मास्टर सर्क्युलर – प्रुडेंशियल गाईडलाईन्स ऑन कॅपिटल ॲडेक्वसी ॲंड मार्केट डिसीप्लीन – इंप्लिमेंटेशन ऑफ दि न्यू कॅपिटल ॲडेक्वसी फ्रेमवर्क ( एनसीएएफ )'' मधील प्रकटीकरणाबाबतच्या सर्व सूचना लागू असतील.

३. ह्याशिवाय, भारतामधील बेसेल ३ भांडवली विनियमनांच्या अंमलबजावणीवरील मार्गदर्शक तत्वे, परिपत्रक डीबीओडी.क्र.बीपी.बीसी.९८/२१.०६.२०१/२०११-१२ दि. मे २, २०१२ अन्वये देण्यात आली आहेत. ह्या मार्गदर्शक तत्वांनुसार विहित केलेल्या प्रकटीकरणांच्या आवश्यकता, त्या जारी होतील तेव्हां, ह्या परिपत्रकातील सूचनांच्या अतिरिक्त आहेत.

आपला

(दिपक सिंघल)
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक

बँकिंग ऑपरेशन्स आणि विकास विभाग, केंद्रीय कार्यालय, १२ वा मजला, शहिद भगत सिंग मार्ग, मुंबई - 400001,
दुरध्वनी : ९१-२२-२२६६१६०२, फॅक्सः ९१-२२-२२७०५६९१/२२७०५६९३, ईमेल : cgmicdbodco@rbi.org.in

**उद्देश** –वित्तीय विवरणपत्रांच्या नोट्स टु अकाऊंट्समधील प्रकटीकरणासंबंधाने बँकांना सविस्तर मार्गदर्शन उपलब्ध करुन देणे.

**वर्गीकरण** –बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम ३५ अ खाली रिझर्व बँकेने दिलेले अनिवार्य मार्गदर्शक तत्व.

**मागील मार्गदर्शक तत्वे रद्दबातल** -"वित्तीय विवरणपत्रामधील प्रकटीकरण - नोट्स टु अकाऊंट्स" वरील, डीबीओडी बीपी.बीसी.क्र. १६/२१.०४.०१८/२०११-१२ दि. जुलै १, २०११ अन्वये दिलेले महापरिपत्रक.

**उपयोगाची व्याप्ति** : सर्व अनुसूचित वाणिज्य बँकांसाठी ( आरआरबी वगळून)

**रचना**


| | |
|---|---|
| १. | प्रस्तावना |
| २.१ | सादरीकरण |
| २.२ | किमान प्रकटीकरणे |
| २.३ | लक्षणीय लेखा धोरणांचा सारांश |
| २.४ | प्रकटीकरणाच्या आवश्यकता |
| ३.१ | भांडवल |
| ३.२ | गुंतवणुकी |
| ३.२.१ | रेपो व्यवहार ( दर्शनी मूल्यावरील ) |
| ३.२.२ | नॉन-एसएलआर गुंतवणुकींचा पोर्ट फोलिआ |
| ३.२.३ | एचटीएम वर्गाला केलेली विक्री/हस्तांतरण |
| ३.३ | डेरिवेटिव्हज |
| ३.३.१ | फॉरवर्ड रेट करार/व्याजदर अदलाबदल |
| ३.३.२ | एक्सचेंज ट्रेडेड व्याजदर डेरिवेटिवज् |
| ३.३.३ | डेरिवेटिव्हजमधील रिस्क एक्सपोजर्सवरील प्रकटीकरणे |
| ३.४ | ॲसेटचा दर्जा |
| ३.४.१ | अकार्यकारी ॲसेट्स |
| ३.४.२ | पुनर्रचित खात्यांचा तपशील |
| ३.४.३ | ॲसेट रिकन्स्ट्रक्शन करण्यासाठी सिक्युरिटायझेशन/रिकन्स्ट्रक्शन कंपनीला विकलेल्या |

| | |
|---|---|
| | वित्तीय ॲसेट्सची माहिताद्ध |
| ३.४.४ | ॲसेट रिकन्स्ट्रक्शन करण्यासाठी सिक्युरिटायझेशन/रिकन्स्ट्रक्शन कंपनीला विकलेल्या वित्तीय ॲसेट्सची माहिताद्ध |
| ३.४.५ | खरेदी केलेल्या/विकलेल्या अकार्यकारी वितीय ॲसेट्सची माहिती स्टँडर्ड ॲसेट्सवरील तरतुद |
| ३.५ | बिझिनेस रेशोज् |
| ३.६ | ॲसेट लायाबिलिटी व्यवस्थापन ॲसेट्स व लायाबिलिटीजच्या विशिष्ट बाबींचा परिपक्वता साचा |
| ३.७ | एक्सपोझस& |
| ३.७.१ | रियल इस्टेट क्षेत्राबाबत एक्सपोझर्स |
| ३.७.२ | भांडवल बाजाराबाबत एक्सपोजर |
| ३.७.३ | जोखीम वर्ग निहाय कंट्री एक्सपोझर |
| ३.७.४ | ३.७.४ सिंगल बॉरोअर लिमिट ( एसजीएल )/ग्रुप बॉरोअर लिमिट ( जीबीएल ) ह्याबाबात बँकेने केलेल्या उलज्ंघनाची माहिती |
| ३.७.५ | अप्रतिभूतित अग्रिम राशी |
| ३.८ | संकीण |
| ३.८.१ | ३.८.१ वर्षामध्ये आय करासाठी केलेल्या तरतुदीची रक्कम - |
| ३.८.२ | आरबीआयने लावलेल्या दंडांचे प्रकटीकरण |
| ४ | “नोट्स टु अकाऊंट्स” साठी आरबीआयने दिलेल्या डिसक्लोजर बाबीसंबंधीच्या अकाऊंटींग मानकांनुसार असलेल्या प्रकटीकरण (डिसक्लोजर ) आवश्यकता |
| ४.१ | अकाऊंटिंग स्टँडर्ड ५ – त्या काळासाठी असलेला नक्त नफा तोटा, पूर्वीच्या काळातील बाबी व लेखा धोरणांमधील बदल |
| ४.२ | अकाऊंटिंग स्टँडर्ड ९ : |
| ४.३ | अकाऊंटिंग स्टँडर्ड १५ कर्मचाऱ्यांसाठी लाभ |
| ४.४ | अकाऊंटिंग स्टँडर्ड १७ |
| ४.५ | अकाऊंटिंग स्टँडर्ड १८ – संबंधित पक्षाची प्रकटीकरणे |
| ४.६ | अकाऊंटिंग स्टँडर्ड २१ - एकत्रीकृत वित्तीय विवरणपत्रे ( सीएफएस ) |

| | |
|---|---|
| ४.७ | अकाऊंटिंग स्टॅंडर्ड २२ - उत्पन्नावरील करांचे अकाऊंटिंग |
| ४.८ | अकाऊंटिंग स्टॅंडर्ड २३ - एकत्रीकृत वित्तीय विवरणपत्रांमध्ये, सहकारी संस्थांमधील गुंतवणुकींसाठी अकाऊंटिंग |
| ४.९ | अकाऊंटिंग स्टॅंडर्ड २४ – बंद करण्याची कार्यकृती |
| ४.१० | अकाऊंटिंग स्टॅंडर्ड २५ – तात्पुरता/हंगामी वित्तीय अहवाल |
| ४.११ | इतर लेखा मानके |
| ५ | अतिरिक्त प्रकटीकरणे |
| ५.१ | तरतुदी व आकस्मिक खर्च |
| ५.२ | तरत्या तरतुदी |
| ५.३ | राखीव निधीमधून ड्रॉ डाऊन |
| ५.४ | तक्रारींचे प्रकटीकरण |
| ५.५ | बॅंकांनी दिलेल्या लेटर ऑफ कंफर्ट ( एलओसी ) चे प्रकटीकरण |
| ५.६ | प्रोव्हिजनिंग कव्हरेज रेशो ( पीसीआर ) |
| ५.७ | बॅंक ॲशुअरन्स व्यवसाय |
| ५.८ | ठेवी, अग्रिम राशी, एक्सपोजर्स व एनपीएची घनता |
| ५.९ | क्षेत्र-निहाय एनपीए |
| ५.१० | एनपीएंची हालचाल |
| ५.११ | विदेशातील ॲसेट्स, एनपीए व महसूल |
| ५.१२ | प्रायोजित केलेले ताळेबंदाबाहेरील एसपीव्ही |
| ५.१३ | अनमॉर्टिज्ड पेन्शन व ग्रॅच्युइटीच्या जबाबदाऱ्या |
| ५.१४ | मोबदल्यावरील प्रकटीकरणे |
| ५.१५ | सिक्युरिटायझेशन संबंधीची प्रकटीकरणे |
| ५.१६ | क्रेडिट डिफॉल्ट टॅक्स |
| जोडपत्र | महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या परिपत्रकांची यादी |

**१. प्रस्तावना** :

वित्तीय विवरणपत्रांचा उपयोग करणाऱ्यांना, आर्थिक निर्णय घेण्यासाठी, बँकेची आर्थिक स्थिती व कामगिरी ह्यासंबंधीची माहिती हवी असते. त्यांना, तिची लिक्विडिटी, व सॉल्वन्सी आणि त्यांच्या ताळेबंदावरील तसेच ताळेबंदाबाहेरील बाबींच्या संबंधातील ॲसेट्स व जबाबदाऱ्या ह्या संबंधीच्या जोखमींमध्ये रस असतो. संपूर्ण प्रकटीकरणाचा विचार करता, काही अत्यंत उपयुक्त अशी माहिती, वित्तीय विवरणपत्रांच्या नोट्समधील माहितीचा उपयोग केल्याने, त्या वित्तीय विवरणपत्रात दिलेल्या किंवा त्या कंपनीच्या वित्तीय कामगिरीवर परिणाम करु शकणाऱ्या काही बाबीं संबंधाने स्पष्टीकरण मिळू शकते. अलिकडेच, बँकिंग क्षेत्रामध्ये, मार्केट डिसिप्लीनकडे बरेच लक्ष दिले जात आहे. तथापि, केवळ मार्केटमध्ये भाग घेणाऱ्यांना वेळेवर व विश्वसनीय माहिती मिळाली असल्यासच मार्केटची शिस्त नीटपणे कार्य करु शकते व अशा माहितीमुळे ते बँकेच्या कार्यकृतींचे व त्यामधील अंगभूत जोखमींचे मूल्यमापन करण्यास मदत होते. मार्केट डिसिप्लीन ठेवण्याचे अनेक लाभ असू शकतात. तीन आधारस्तंभांपैकी एक समजला जात असल्याने, बेसेल २ साचाखाली मार्केट डिसिप्लीनला योग्य ते महत्व दिले गेले आहे.

**२.१ सादरीकरण** :

एकसमानता ठेवण्यासाठी लेखा धोरणे व नोट्स टु अकाऊंट्सचा सारांश अनुक्रमे शेड्युल १७ व शेड्युल १८ खाली दाखविला जावा.

**२.२ किमान प्रकटीकरणे** :

किमानपक्षी, ह्या परिपत्रकात निर्देश केलेल्या बाबी ''नोट्स टु अकाऊंट्स'' मध्ये प्रकट केल्या जाव्यात. बँकांनी, ह्या परिपत्रकातील किमान प्रकटीकरणांऐवजी अधिक व सर्वसमावेशक प्रकटीकरणे देण्यासाठी, ( विशेषतः ती लक्षणीय तसेच बँकेची वित्तीय स्थिती व कामगिरी समजण्यास मदत होत असल्यास ) प्रोत्साहन देण्यात येत आहे. येथे देण्यात आलेली प्रकटीकरणे, केवळ पूरक म्हणूनच आहेत व संबंधित कायदे किंवा अकाऊंटिंग व फायनान्शियल रिपोर्टिंग मानकांखाली आवश्यक असलेल्या इतर प्रकटीकरणांसाठी नाहीत. जेथे संबंधित आहे तेथे, बँकांनी लागु असलेल्या इतर प्रकटीकरण आवश्यक्तांचे पालन करावे.

**२.३ लक्षणीय लेखा धोरणांचा सारांश** :

बँकांनी त्यांच्या वित्तीय विवरणपत्रात नोट्स टु अकाऊंट्ससह, एकाच जागी, ( शेड्युल १७ खाली ) कार्यकृतींच्या महत्वाच्या क्षेत्रांबाबत असलेली लेखा धोरणे स्पष्टपणे द्यावीत. पुढील सूचनात्मक यादीमध्ये पुढील गोष्टी समाविष्ट आहेत – विदेशी मुद्रेशी संबंधित व्यवहार, गुंतवणुकी - वर्गीकरण, मूल्यमापन इत्यादि, त्यावरील अग्रिम राशी व तरतुदी, स्थिर ॲसेट्स व घसारा, उत्पन्नाची ओळख, कर्मचाऱ्यांना दिलेले लाभ, करांसाठी तरतुद, निव्वळ नफा इत्यादि.

**२.४ प्रकटीकरणाच्या आवश्यकता**

मार्केटमध्ये शिस्त वाढावी ह्यासाठी रिझर्व बँकेने गेल्या अनेक वर्षांपासून प्रकटीकरणाच्या आवश्यकतांचा एक संच निर्माण केला असून त्यामुळे, मार्केटमध्ये भाग घेणाऱ्यांना, कॅपिटल ॲडेक्वसी, रिस्क एक्सपोजर्स, जोखीम मूल्यांकनाच्या प्रक्रिया आणि मुख्य असे व्यवहारांचे पॅरामीटर्स ह्यांचे मूल्यमापन करण्यास मदत होते. त्यामुळे तुलनीयता वाढविण्यास मदत करणारा एक सातत्य असलेला व समजण्यासारखा प्रकटीकरणाचा साचा उपलब्ध होतो. इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया ( आयसीएआय ) ह्यांनी दिलेल्या, डिसक्लोझर्स ऑफ अकाउंटिंग पॉलिसीज वरील लेखा मानकांचे (एएस १) पालन करणेही बँकांसाठी आवश्यक आहे. ही वाढीव प्रकटीकरणे, बँकांच्या ताळेबंदांचे व नफा-तोटा लेखांचे पुनरावलोकन करुन आणि

"नोट्स टु अकाउंट्स" मध्ये करावयाच्या प्रकटीकरणाची व्याप्ती वाढवून साध्य करण्यात आली आहेत. ताळेबंदीसाठी विहित केलेल्या १६ विस्तृत शेड्युल्सच्या अतिरिक्त, बँकांना पुढील "माहिती, नोट्स टु अकाउंट्स" मध्ये देणे आवश्यक आहे.

**३.१ भांडवल –**

( रक्कम रु. कोटींमध्ये )

| *तपशील* | *चालु वर्ष* | *मागील वर्ष* |
|---|---|---|
| (१)सीआरएआर (%)<br>(२) सीआरएआर – टायर १ भांडवल (%)<br>(३) सीआरएआर - टायर २ भांडवल (%)<br>(४) राष्ट्रीयकृत बँकांमध्ये भारत सरकारच्या भाग धारणाची टक्केवारी<br>(५) टायर २ – भांडवल म्हणून उभ्या केलेल्यास बॉर्डिनेटेड कर्जाची रक्कम *<br>(६) आयपीडीआय देऊन उभी केलेली रक्कम<br>(७) अपर टायर २ संलेख देऊन उभी केलेली रक्कम ** | | |

* टायर २ भांडवलामध्ये समाविष्ट करण्यासाठी, मुख्य कार्यालयातून मिळविलेल्या सबॉर्डिनेटेड कर्जाची एकूण रक्कम, ताळेबंदामध्ये "सबॉर्डिनेटेड लोन इन दि नेचर ऑफ लाँग टर्म बॉरोईग्जं इन फॉरिन करन्सी फ्रॉम हेड ऑफिस" ह्या शीर्षकाखाली प्रकट केली जावी.

** मुख्य कार्यालयाकडून मिळविलेली एकूण पात्र रक्कम, ताळेबंदात "अपर टायर २ कॅपिटल रेज्ड इन दि फॉर्म ऑफ हेड ऑफिस बॉरोईग्जं इन फॉरिन करन्सी" ह्या शीर्षकाखाली प्रकट केली जावी.

### ३.२ गुंतवणुकी

| *तपशील* | *चालु वर्ष* | *मागील वर्ष* |
|---|---|---|
| (१) गुंतवणुकींचे मूल्य –<br>(१) गुंतवणुकींचे एकूण मूल्य<br>(अ) भारतामधील<br>(ब) भारताबाहेर<br><br>(२) घसाऱ्यासाठी तरतुद<br>(अ) भारतामधील<br>(ब) भारताबाहेर<br><br>(३) गुंतवणुकींचे निव्वळ मूल्य<br>(अ) भारतामधील<br>(ब) भारताबाहेर<br>(२) गुंतवणुकीवरील घसारा म्हणून ठेवलेल्या तरतुदींची हालचाल -<br>(१) खुलती शिल्लक<br>(२) अधिक : त्या वर्षामध्ये केलेल्या तरतुदी<br>(३) वजा : त्या वर्षातील राईट ऑफ/राईट बॅक केलेल्या अतिरिक्त तरतुदी.<br>(४) बंद शिल्लक | | |

### ३.२.१ रेपो व्यवहार ( दर्शनी मूल्यावरील )

( रक्कम रु. कोटींमध्ये )

| | *वर्षामधील किमान आऊटस्टँडिंग* | *वर्षामधील कमाल आऊटस्टँडिंग* | *वर्षामधील दैनिक सरासरी आऊटस्टँडिंग* | *मार्च ३१ रोजी आऊटस्टँडिंग* |
|---|---|---|---|---|
| रेपोखाली विकलेल्या सिक्युरिटीज् –<br>(१) सरकारी सिक्युरिटीज्<br>(२) कॉर्पोरेट डेट सिक्युरिटीज्. | | | | |
| रिव्हर्स रेपोखाली खरेदी केलेल्या सिक्युरिटीज् –<br>१) सरकारी सिक्युरिटी<br>(२) कॉर्पोरेट डेट सिक्युरिटीज्. | | | | |

### ३.२.२ नॉन-एसएलआर गुंतवणुकींचा पोर्ट फोलिओ

(१) *नॉन एसएलआर गुंतवणुकींचा प्रचालकांची संयुक्त माहिती*

( रक्कम रु. कोटींमध्ये )

| क्र. | प्रचालक | रक्कम | प्रायव्हेट प्लेसमेंटचे प्रमाण | "बिलो इनवेस्टमेंट ग्रेड" सिक्युरिटीजचे प्रमाण | "अनरेटेडे" सिक्युरिटीजचे प्रमाण | "अनलिस्टेड"सिक्युरिटीजचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पीएसयु | | | | | |
| २ | एफ आय | | | | | |
| ३ | बँका | | | | | |
| ४ | खाजगी कार्पोरेट्स | | | | | |
| ५ | दुय्यम संस्था/संयुक्त उद्योग | | | | | |
| ६ | इतर | | | | | |
| ७ | घसाऱ्यासाठी ठेवलेल्या तरतुदी | | XXX | XXX | XXX | XXX |
| | एकूण * | | | | | |

सूचना – (१) * वरील स्तंभ ३ खालील एकूण रक्कम, ताळेबंदाच्या शेड्युल ८ मधील पुढील वर्गांखाली समाविष्ट केलेल्या एकूण गुंतवणुकींशी जुळली पाहिजे –

(अ) शेअर्स
(ब) डिबेंचर्स व बॉंड्स
(क) दुय्यम कंपन्या/संयुक्त उद्योग
(ड) इतर.

(२) वरील स्तंभ ४, ५, ६ व ७ खाली दिलेल्या रकमा म्युच्युअली एक्सक्लुजिव असाव्यात असे नाही.

२) *अ-कार्यकारी नॉन – एसएलआर गुंतवणुकी*

( रक्कम रु. कोटींमध्ये )

| *तपशील* | |
|---|---|
| ओपनिंग बॅलन्स | |
| १ एप्रिलपासून त्या वर्षात पडलेली भर | |
| त्या वर्षामध्ये झालेली घट | |
| क्लोजिंग बॅलन्स | |
| ठेवलेल्या एकूण तरतुदी | |

### ३.२.३ एचटीएम वर्गाला केलेली विक्री/हस्तांतरण

एचटीएम वर्गाला विकलेल्या/हस्तांतरित केलेल्या सिक्युरिटीजचे मूल्य, वर्षाच्या सुरुवातीस एचटीएम वर्गात असलेल्या गुंतवणुकींच्या पुस्तकी मूल्याच्या ५ टक्क्यांपेक्षा अधिक असल्यास, बँकेने त्या एचटीएम वर्गात ठेवलेल्या गुंतवणुकींचे बाजारमूल्य प्रकट करावे आणि ज्यासाठी तरतुद केली नाही अशा बाजारमूल्यापेक्षा जास्त असलेले पुस्तकीमूल्य निर्देशित करावे. बँकेच्या, ऑडिट केलेल्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रातील ''नोट्स टु अकाउंट्समध्ये'' हे प्रकटीकरण करणे आवश्यक आहे. वर निर्देशित केलेल्या ५ टक्क्यांमध्ये, बँकेच्या संचालक मंडळाच्या संमतीने, लेखा वर्षाच्या सुरुवातीस बँकांद्वारे करण्यास परवानगी असलेले, एकदाच केलेले सिक्युरिटीजचे हस्तांतरण व ओएमओ लिलावांखाली रिझर्व बँकेला केलेली विक्री समाविष्ट नाही.

## ३.३ डेरिवेटिव्ज्

### ३.३.१ फॉरवर्ड रेट करार/व्याजदर अदलाबदल

( रक्कम रु. कोटींमध्ये )

| *तपशील* | *चालु वर्ष* | *मागील वर्ष* |
|---|---|---|
| १. स्वॅप ॲग्रीमेंट्सचे उद्दिष्टात्मक (नोशनल) मुद्दल<br>२. ह्या कराराखालील दायित्वे प्रतिपक्षाकडून पूर्ण न झाल्यास होऊ शकणारा तोटा<br>३. स्वॅप्समध्ये भाग घेतल्यावर बँकेला आवश्यक असलेले तारण<br>४. अशा स्वॅप्स पासून निर्माण झालेली कर्ज-जोखमींची घनता $<br>५. स्वॅपबुकाची फेअर व्हॅल्यु @ | | |

**सूचना** –स्वॅप्सच्या अटी व स्वरुप व त्यासह क्रेडिट व बाजार जोखीम ह्यावरील माहिती व असे स्वॅप्स रेकॉर्ड करण्यासाठी स्वीकारलेली धोरणेही प्रकट केली जावीत.

$ घनतेबाबतची उदाहरणे म्हणजे विशिष्ट उद्योगांच्या बाबतीत असलेले एक्सपोझर्स किंवा उच्चतर कंपन्यांबरोबर केलेले स्वॅप्स.

@ स्वॅप्स हे विशिष्ट ॲसेट्स, जबाबदाऱ्या किंवा दायित्वांशी/आश्वासनांशी जोडलेले असल्यास, फेअर व्हॅल्यु म्हणजे, **ताळेबंदाच्या तारखेस ते स्वॅप करार समाप्त करण्यासाठी बँकेला मिळू शकणारी किंवा बँकेला द्यावी लागणारी अंदाजे रक्कम** ट्रेडिंग स्वॅपसाठी, फेअर व्हॅल्यु म्हणजे मार्क टु मार्केट.

### ३.३.२ एक्सचेंज ट्रेडेड व्याजदर डेरिवेटिवज्

( रक्कम रु. कोटींमध्ये )

| *अनुक्रमांक* | *तपशील* | |
|---|---|---|
| १ | त्या वर्षात ( संलेख निहाय ) केलेल्या एक्सचेंज ट्रेडेड व्याजदर डेरिवेटिवज्ची नोशनल मुद्दल रक्कम<br>(अ)<br>(ब)<br>(क) | |
| २ | ३१ मार्च ....... रोजी आऊटस्टँडिंग असलेली ( संलेख निहाय ) एक्सचेंज ट्रेडेड व्याजदर डेरिवेटिव्ज्च्या नोशनल मुद्दलाची रक्कम<br>(अ)<br>(ब)<br>(क) | |

| | | |
|---|---|---|
| ३ | आऊटस्टँडिंग असलेली व "हायली इफेक्टिव" नसलेली ( संलेख निहाय )<br>एक्सचेंज ट्रेडेड व्याजदर डेरिवेटिव्जची नोशनल मुद्दल रक्कम<br>(अ)<br>(ब)<br>(क) | |
| | आऊटस्टँडिंग असलेली व "हायली इफेक्टिव" नसलेली ( संलेख निहाय )<br>एक्सचेंज ट्रेडेड व्याजदर डेरिवेटिवज्ची मार्क-टु-मार्केट किंमत<br>(अ)<br>(ब)<br>(क) | |

### ३.३.३ डेरिवेटिव्जमधील रिस्क एक्सपोजर्सवरील प्रकटीकरणे

*गुणात्मक प्रकटीकरणे*

बँकांनी, त्या डेरिवेटिवज्चा वापर, संबंधित जोखीम आणि व्यवसायातील उपयोग ह्या संबंधाने असलेल्या त्यांच्या जोखीम व्यवस्थापन धोरणांवर चर्चा करावी. अशा चर्चेमध्ये पुढील गोष्टींचाही समावेश असावा –

(अ) डेरिवेटिव-ट्रेडिंगमधील जोखीम व्यवस्थापनासाठी असलेल्या संस्थेची रचना
(ब) जोखीम-मापन, जोखीम कळविणे व जोखमींवर देखरेख ठेवणाऱ्या प्रणालींची व्याप्ती व स्वरुप
(क) हेजिंग आणि/किंवा जोखीम टाळण्यासाठी असलेली धोरणे आणि हेजेस/मिटिगंट्सची परिणामकारकता.
टिकविण्याबाबतच्या देखरेखीसाठी प्रक्रिया
(ड) हेज व नॉन हेज व्यवहार रेकॉर्ड करणे, उत्पन्नाची ओळख, प्रिमियम व डिसकाउंट, आऊटस्टँडिंग कॉंट्रॅक्ट्सचे
मूल्यमापन तरतूदीकरण व क्रेडिट रिस्क मिटिगेशन ह्यासाठी लेखा धोरण.

*आकारमानात्मक प्रकटीकरणे*

( रक्कम रु. कोटींमध्ये )

| अनुक्रमांक | तपशील | करन्सी डेरिवेटिवज् | व्याजदर डेरिवेटिवज् |
|---|---|---|---|
| १ | डेरिवेटिवज् (नोशनल मुद्दल रक्कम ) | | |
| | (अ) हेजिंगसाठी | | |
| | (ब) ट्रेडिंगसाठी | | |
| २ | मार्कड् टु मार्केट स्थिती (१) | | |
| | (अ) ॲसेट (+) | | |
| | (ब) जबाबदारी (-) | | |
| ३ | क्रेडिट एक्सपोजर (२) | | |
| ४ | (१) व्याजदरात एक टक्का बदल झाल्यास संभाव्य परिणाम ( १०० * पीव्ही ०१ ) स | | |
| | (अ) हेजिंग डेरिवेटिव्जवर | | |
| | (ब) ट्रेडिंग डेरिवेटिव्जर | | |
| ५ | वर्षामध्ये दिसून आलेला कमाल किमान १००* पीव्ही | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | ०१ –<br>(अ) हेजिंगवर<br>(ब) ट्रेडिंगवर | | |

### ३.४ ॲसेटचा दर्जा

### ३.४.१ अकार्यकारी ॲसेट्स

( रक्कम रु. कोटींमध्ये )

| *तपशील* | *चालु वर्ष* | *मागील वर्ष* |
|---|---|---|
| १. निव्वळ एनपीए चे निव्वळ अग्रिम राशी (%) | | |
| २. एनपीएंची हालचाल ( एकूण ) - | | |
| (अ) उघडती शिल्लक | | |
| (ब) वर्षामधील वाढ | | |
| (क) वर्षामधील घट | | |
| (ड) बंद शिल्लक | | |
| ३. निव्वळ एनपीएंची हालचाल – | | |
| (अ) उघडती शिल्लक | | |
| (ब) वर्षामधील वाढ | | |
| (क) वर्षामधील घट | | |
| (ड) बंद शिल्लक | | |
| ४. एनपीएंसाठी केलेल्या तरतुदींची हालचाल ( स्टँडर्ड ॲसेट्वरील तरतुदी सोडून ) | | |
| (अ) उघडती शिल्लक | | |
| (ब) त्या वर्षात केलेली तरतुद | | |
| (क) *अतिरिक्त तरतुदींचे राईट ऑफ/राईट बॅक* | | |
| (ड) बंद शिल्लक | | |

### ३.४.२ पुनर्रचित खात्यांचा तपशील

( रक्कम रु. कोटींमध्ये )

| | | **सीडीआर यंत्रणा** | **एसएमई कर्जाची पुनर्रचना** | **इतर** |
|---|---|---|---|---|
| पुनर्रचित स्टँडर्ड ॲडव्हान्सेस | कर्जदारांची संख्या, | | | |
| | येणे रक्कम, | | | |
| | त्याग ( फेअर व्हॅल्युमधील घट) | | | |
| सबस्टँडर्ड ॲडव्हान्सेस | कर्जदारांची संख्या, | | | |
| | येणे रक्कम, | | | |
| पुनर्रचित | त्याग ( फेअर व्हॅल्युमधील घट) | | | |
| पुनर्रचित शंकास्पद ॲडव्हान्सेस | कर्जदारांची संख्या, | | | |
| | येणे रक्कम, | | | |
| | त्याग ( फेअर व्हॅल्युमधील घट) | | | |
| **एकूण बेरीज** | कर्जदारांची संख्या, | | | |
| | येणे रक्कम, | | | |
| | त्याग ( फेअर व्हॅल्युमधील घट) | | | |

**सूचना** –बँकांनी, ज्यांची खाती पुनर्रचित केली आहेत अशा कर्जदारांची खाती/सुविधा तसेच त्या सुविधेच्या पुनर्रचित भागामधील एकूण थकित रक्कम देखील अवश्य प्रकट केली पाहिजे. ह्याचाच अर्थ, एखाद्या कर्जदाराची एखादीच सुविधा/खाते पुनर्रचित केले गेले असल्यास, बँकेने त्या विशिष्ट कर्जदाराला दिलेल्या इतर सर्व सुविधा/खाती ह्यामधील थकबाकी प्रकट केली पाहिजे.

### ३.४.३ ॲसेट रिकन्स्ट्रक्शन करण्यासाठी सिक्युरिटायझेशन/रिकन्स्ट्रक्शन कंपनीला विकलेल्या वित्तीय ॲसेट्सची माहिता

( रक्कम रु. कोटींमध्ये )

| *तपशील* | *चालु वर्ष* | *मागील वर्ष* |
|---|---|---|
| (१) खात्यांची संख्या<br>(२) एससी/आरसीला विकलेल्या खात्यांचे एकूण मूल्य ( निव्वळ तरतुदी )<br>(३) एकूण कन्सिडरेशन पूर्वीच्या<br>(४) पूर्वीच्या वर्षांमध्ये मिळालेले अतिरिक्त कन्सिडरेशन<br>(५) निव्वळ पुस्तकी मूल्यावरील एकूण नफा/तोटा. | | |

### ३.४.४ खरेदी केलेल्या/विकलेल्या अकार्यकारी वितीय ॲसेट्सची माहिति

इतर बँकांकडून अकार्यकारी वित्तीय ॲसेट्स खरेदी करणाऱ्या बँकांना, त्यांच्या ताळेबंदातील ‘‘नोट्स टु अकाऊंट्स’’ मध्ये पुढील प्रकटीकरणे देणे आवश्यक आहे.

(अ) *खरेदी केलेल्या अकार्यकारी वितीय ॲसेट्सची माहिती*

( रक्कम रु. कोटींमध्ये )

| *तपशील* | *चालु वर्ष* | *मागील वर्ष* |
|---|---|---|
| १) (अ) वर्षामध्ये खरेदी केलेल्या खात्यांची संख्या | | |
| (ब) एकूण आऊटस्टँडिंग | | |
| (२)(अ) ह्यापैकी त्या वर्षात पुनर्रचित केलेल्या खात्यांची संख्या | | |
| (ब) एकूण आऊटस्टँडिंग | | |

(ब) *विकलेल्या अकार्यकारी वित्तीय ॲसेट्सची माहिती*

( रक्कम रु. कोटींमध्ये )

| *तपशील* | *चालु वर्ष* | *मागील वर्ष* |
|---|---|---|
| १. विकलेल्या खात्यांची संख्या | | |
| २. एकूण आऊटस्टँडिंग | | |
| ३. मिळालेले एकूण कन्सिडरेशन | | |

### ३.४.५ स्टँडर्ड ॲसेट्सवरील तरतुद

( रक्कम रु. कोटींमध्ये )

| *तपशील* | *चालु वर्ष* | *मागील वर्ष* |
|---|---|---|
| स्टँडर्ड ॲसेट्ससाठी तरतुदी | | |

**सूचना** –स्टँडर्ड ॲसेट्ससाठी केलेली तरतुद ही एकूण अग्रिमराशींवरुनच काढली पाहिजे असे नाही, तर ती, ताळेबंदाच्या शेड्युल ५ मधील ‘‘अदर लायाबिलिटीज अँड प्रोव्हिजन्स – अदर्स’’ह्याखाली, ‘‘प्रोव्हिजन्स अगेन्स्ट स्टँडर्ड ॲसेट्स’’अशी वेगळी दाखविली जावी.

### ३.५ बिझिनेस रेशोज्

| *तपशील* | *चालु वर्ष* | *मागील वर्ष* |
|---|---|---|
| (१) कार्यकारी निधीच्या टक्केवारीत व्याज – उत्पन्न $ | | |
| (२) कार्यकारी निधीच्या टक्केवारीत व्याज नसलेले उत्पन्न | | |
| (३) कार्यकारी निधीच्या टक्केवारीत कार्यकारी नफा $ | | |
| (४) ॲसेट्सवरील परतावा @ | | |
| (५) प्रतिकर्मचारी उलाढाल # ( ठेवी अधिक अग्रिमराशी ) ( रु. कोटींमध्ये ) | | |
| (६) प्रति कर्मचारी – नफा (रु. कोटींमध्ये ). | | |

$ बँकिंग रेग्युलेशन अधिनियम १९४९ च्या कलम २७ खाली, फॉर्म एक्समध्ये, रिझर्व बँकेला कळविलेल्या, आर्थिक वर्षाच्या १२ महिन्यांमध्ये, असलेल्या ॲसेट्सची सरासरी घेऊन ( संचयित ॲसेट्स सोडून ) कार्यकारी निधी काढला जावा.

@ ॲसेट्सवरील परतावा हा सरासरी कार्यकारी निधीच्या संदर्भात ( म्हणजे, संचयित ॲसेट्स सोडून असलेले एकूण ॲसेट्स ) असेल.

# प्रति कर्मचारी झालेला व्यवसाय ( ठेवी + अग्रिम राशी ) काढण्यासाठी आंतर-बँकीय ठेवी वगळण्यात याव्यात.

### ३.६ ॲसेट लायाबिलिटी व्यवस्थापन

**ॲसेट्स व लायाबिलिटीजच्या विशिष्ट बाबींचा परिपक्वता साचा**

(रक्कम रु. कोटींमध्ये)

| | दिवस १ | २ ते ७ दिवस | ८ ते १४ दिवस | १५ ते २८ दिवस | २९ दिवस ते ३ महिने | ३ महिन्यांपेक्षा जास्त व ६ महिन्यांपर्यंत | ६ महिन्यांपेक्षा जास्त व १ वर्षापर्यंत | १ वर्षापेक्षा जास्त व ३ वर्षापर्यंत | ३ वर्षापेक्षा जास्त व ५ वर्षापर्यंत | ५ वर्षापेक्षा जास्त | बेरीज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ठेवी | | | | | | | | | | | |
| अग्रिम | | | | | | | | | | | |
| गुंतवणुकी कर्जे | | | | | | | | | | | |
| विदेशी | | | | | | | | | | | |
| मुद्रेतील ॲसेट्स | | | | | | | | | | | |
| विदेशी | | | | | | | | | | | |

| मुद्रेतील जबाबदाऱ्या. | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

## <u>३.७ एक्सपोझस</u>&

### ३.७.१ रियल इस्टेट क्षेत्राबाबत एक्सपोझर्स

(रक्कम रु. कोटींमध्ये)

| वर्ग | चालु वर्ष | मागील वर्ष |
|---|---|---|
| (अ) थेट एक्सपोझर<br>(१) निवासी गहाणवटी –<br><br>कर्जदाराकडून निवास केला जाणाऱ्या किंवा भाड्याने दिलेल्या निवासी मालमत्तेवरील गहाणवटीने, संपूर्णपणे प्रतिभूतित असे कर्ज ( प्राधान्य क्षेत्रातील कर्ज म्हणून समाविष्ट करण्यास पात्र असलेली वैयक्तिक गृहकर्जे वेगळी दाखवावीत )<br><br>(२) व्यापारी रियल इस्टेट –<br><br>व्यापारी रियल इस्टेट वरील ( ऑफिस इमारती, रिटेल जागा, बहुउद्देशीय व्यापारी जागा, बहु-कुटुंबीय निवासी इमारती, अनेक भाडेकरु असलेली व्यापारी जागा, औद्योगिक किंवा भंडारण जागा, हॉटेल्स, भू-संपादन, विकास, बांधकाम इत्यादी ) गहाणवटीने प्रतिभूतित कर्जे. अशा एक्सपोजर्समध्ये निधी आधारित नसलेल्या ( एनएफबी ) मर्यादा असू शकतात.<br><br>(३) मॉर्गेज बॅक्ड सिक्युरिटीज ( एमबीएस ) व इतर प्रतिभूतित एक्सपोजर्स -<br><br>(अ) निवासी<br><br>(ब) व्यापारी रियल इस्टेट<br><br>(ब) *अप्रत्यक्ष एक्सपोजर*<br><br>नॅशनल हाऊसिंग बँक ( एनएचबी ) आणि हाऊसिंग फायनान्स कंपन्या ( एचएफसी ) ह्यावरील निधी आधारित असलेले व निधी आधारित नसलेले एक्सपोजर्स. | | |
| रियल इस्टेट क्षेत्राबाबत एकूण एक्सपोजर | | |

## ३.७.२ भांडवल बाजाराबाबत एक्सपोजर

(रक्कम रु. कोटींमध्ये )

| *तपशील* | *चालु वर्ष* | *मागील वर्ष* |
|---|---|---|
| (१) इक्विटी शेअर्स, परिवर्तनीय बॉंड्स परिवर्तनीय डिबेंचर्स व कॉर्पोरेट कर्जामध्ये संपूर्णपणे न गुंतवलेले, म्युच्युअल फंडांचे इक्विटी ओरिएंटेड युनिट्स, ह्यामध्ये थेट गुंतवणुक.<br><br>(२) शेअर्स/बॉंड्स/डिबेंचर्स किंवा अन्य प्रतिभूती ह्यांच्या विरुद्ध किंवा शेअर्स ( आयपीओ/ईएसओपी) परिवर्तनीय बॉंड्स, परिवर्तनीय डिबेंचर्स आणि इक्विटी ओरिएंटेड म्युच्युअल फंडाच्या एककात गुंतवणुक करण्यासाठी ( स्वच्छ धर्तीवर ) व्यक्तींना दिलेल्या अग्रिम राशी.<br><br>(३) जेथे शेअर्स किंवा परिवर्तनीय बॉंड्स किंवा परिवर्तनीय डिबेंचर्स किंवा इक्विटी ओरिएंटेड म्युच्युअल फंडांचे युनिट्स, प्राथमिक प्रतिभूती समजल्या जातात अशा कोणत्याही उद्देशासाठी अग्रिम राशी<br><br>(४) शेअर्स किंवा परिवर्तनीय बॉंड्स किंवा परिवर्तनीय डिबेंचर्स किंवा इक्विटी ओरिएंटेड म्युच्युअल फंडांचे युनिट्स ह्यांच्या तारणाने प्रतिभूतित केलेल्या अन्य कोणत्याही उद्देशासाठीच्या अग्रिम राशी ( उदा. जेथे शेअर्स/परिवर्तनीय बॉंड्स/परिवर्तनीय डिबेंचर्स/इक्विटी ओरिएंटेड म्युच्युअल फंडांचे युनिट्स, ह्यांची प्राथमिक प्रतिभूती, संपूर्ण अग्रिम राशींएवढी असत नाही )<br><br>(५) स्टॉक ब्रोकर्सना दिलेल्या प्रतिभूतित किंवा अप्रतिभूतित अग्रिम राशी आणि स्टॉक ब्रोकर्स व मार्केट मेकर्स ह्यांच्या वतीने दिलेल्या हमी<br><br>(६) शेअर्स/बॉंड्स/डिबेंचर्स किंवा अन्य प्रतिभूती किंवा स्वच्छ धर्तीवर, नव्या कंपन्यांच्या इक्विटीसाठी, स्रोत उभे करण्याच्या भावी हेतुसाठी, कॉर्पोरेट संस्थांना दिलेली कर्जे<br><br>(७) अपेक्षित इक्विटी प्रवाह/इश्युज विरुद्ध कंपन्यांना दिलेली ब्रिज लोन्स<br><br>(८) शेअर्स किंवा परिवर्तनीय बॉंड्स किंवा परिवर्तनीय डिबेंचर्स किंवा इक्विटी ओरिएंटेड म्युच्युअल फंडांचे युनिट्स ह्यांच्या प्राथमिक इश्युबाबत बॅंकांनी घेतलेली अंडररायटिंग दायित्वे<br><br>(९) मार्जिन ट्रेडिंगसाठी स्टॉक ब्रोकर्सना अर्थ सहाय्य करणे<br><br>(१०) व्हेंचर कॅपिटल फंडांबाबत ( पंजीकृत तसेच अ-पंजीकृत ) असलेले एक्सपोझर | | |
| भांडवली बाजाराबाबतचे एकूण एक्सपोझर. | | |

## ३.७.३ जोखीम वर्ग निहाय कंट्री एक्सपोझर

(रक्कम रु. कोटींमध्ये)

| जोखीम वर्ग * | मार्च ...... ( चालु वर्ष) रोजीचे एक्सपोझर ( निव्वळ ) | मार्च ...... रोजी ( चालु वर्ष ) ठेवलेली तरतुद | मार्च ...... ( मागील वर्ष ) रोजीचे एक्सपोझर (निव्वळ ) | मार्च ...... रोजी ( मागील वर्ष ) ठेवलेली तरतुद |
|---|---|---|---|---|
| अलक्षणीय | | | | |
| कमी | | | | |
| मध्यम | | | | |
| उच्च | | | | |
| अति उच्च | | | | |
| निर्बंधित | | | | |
| ऑफ-क्रेडिट | | | | |
| एकूण | | | | |

* बँका, अंतर्गत रेटिंग प्रणाली सुरु करीपर्यंत, बँकांनी, ईसीजीसीने अंगिकार केलेल्या वर्गीकरणाच्या सात वर्गांचा उपयोग, वर्गीकरण करण्यासाठी व कंट्री रिस्क ( एक्सपोजर्ससाठी तरतुद करण्यासाठी करावा. बँकांनी तशी विनंती केल्यास, ईसीजीसी त्यांच्या कंट्री वर्गीकरणाची तिमाही माहिती उपलब्ध करुन देईल व तात्पुरत्या काळातील कंट्री वर्गीकरणातील बदलही बँकांना कळवेल.

**३.७.४ सिंगल बॉरोअर लिमिट ( एसजीएल )/ग्रुप बॉरोअर लिमिट ( जीबीएल ) ह्याबाबात बँकेने केलेल्या उल्लंघनाची माहिती**

बँकांनी, त्या वर्षात प्रुडेंशियल एक्सपोजर मर्यादांचे उल्लंघन केलेल्या एक्सपोजर्स बाबतची माहिती, त्यांच्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रातील “नोट्स टु अकाउंट्स” मध्ये सुयोग्य रितीने प्रकट करावी. मंजुर केलेली मर्यादा किंवा संपूर्ण थकबाकी ह्यापैकी अधिक असलेली रक्कमच, एक्सपोजर मर्यादा काढण्यासाठी आणि प्रकटीकरणासाठी विचारात घेतली जाईल.

**३.७.५ अप्रतिभूतित अग्रिम राशी**

बँकांच्या ताळेबंदातील शेड्युल ९ मधील अप्रतिभूतित अग्रिम राशी प्रतिवर्तित होण्यासाठी व अधिक पारदर्शकता येण्यासाठी, सांगण्यात येते की –

(अ) प्रसिद्ध केलेल्या ताळेबंदातील शेड्युल ९ मध्ये प्रतिवर्तित केलेल्या, अप्रतिभूतित अग्रिम राशींची रक्कम काढण्यासाठी, त्यांनी वितसहाय्य केलेल्या प्रकल्पांच्या बाबतीत ( पायाभूत सोयी प्रकल्पांसह ) बँकांना दिलेले हक्क, परवाने, प्राधिकृतीकरणे इत्यादि, ही मूर्त प्रतिभूति समजली जाऊ नये. त्यामुळे अशा अग्रिम राशी अप्रतिभूतित समजल्या जातील.

(ब) हक्क, परवाने, प्राधिकरणे ह्यासारखे चार्जेस, ह्यासारख्या अमूर्त प्रतिभूती तसेच अशा अमूर्त तारणांची काढलेली रक्कमही बँकांनी प्रकट करावी आणि हे प्रकटीकरण, “नोट्स टु अकाउंट्स” मध्ये वेगळ्या शीर्षकाखाली द्यावे. ह्यामुळे, अशी कर्जे, इतर संपूर्णपणे अप्रतिभूतित कर्जांपेक्षा वेगळी दिसतील.

**३.८. आरबीआयने लावलेल्या दंडांचे प्रकटीकरण**

सध्या रिझर्व बँकेला, बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम ४६(४) च्या तरतुदीखाली, ह्या अधिनियमातील कोणत्याही तरतुदीचे किंवा त्याच्या अन्य कोणत्याही आवश्यकतांचे, किंवा रिझर्व बँक अधिनियमाच्या अन्य कोणत्याही आदेशाचे, किंवा नियमाचे उल्लंघन केले गेल्यास, एखाद्या वाणिज्य बँकेला दंड करण्याचा अधिकार दिले गेले आहेत. नियंत्रकाने ठोठावलेल्या दंडांचे प्रकटीकरण करण्याच्या आंतरराष्ट्रीय पध्दतीला अनुसरुन, असे ठरविण्यात आले आहे की, सार्वजनिक क्षेत्रातील बँकेला लावलेल्या दंडांची माहिती तिचे गुंतवणुकदार व ठेवीदारांच्या हितासाठीच असेल. असेही ठरविण्यात आले की,

तपासणी – रिपोर्टावर किंवा अन्य आधारित शेरे किंवा निदेश हे सार्वजनिक ठेवले जावेत. असा दंड, ताळेबंदातील ‘‘नोट्स टु अकाउंट्स’’ मध्ये प्रकाशित केला जावा.

## ४. ‘‘नोट्स टु अकाऊंट्स’’ साठी आरबीआयने दिलेल्या डिसक्लोजर बाबीसंबंधीच्या अकाऊंटींग मानकांनुसार असलेल्या प्रकटीकरण (डिसक्लोजर ) आवश्यकता

### (४.१) अकाऊंटिंग स्टँडर्ड ५ – त्या काळासाठी असलेला नक्त नफा तोटा, पूर्वीच्या काळातील बाबी व लेखा धोरणांमधील बदल

बँकिंग रेग्युलेशन अधिनियम १९४९ च्या तिसऱ्या शेड्युलखालील फॉर्म ब मध्ये विहित केलेला नफा-तोटा लेखेचा नमुना, विद्यमान वर्षाच्या नफा-तोट्यावर, मागील वर्षाच्या बाबींचा परिणाम दाखवत नसल्याने, अशी प्रकटीकरणे, आवश्यक असतील तेथे, बँकांच्या ताळेबंदातील ‘‘नोट्स टु अकाऊंट्स’’मध्ये दाखविण्यात यावीत.

### (४.२) अकाऊंटिंग स्टँडर्ड ९ : उत्पन्नाची ओळख

ह्या मानकानुसार, ‘‘डिसक्लोजर ऑफ अकाऊंटिंग पॉलिसिज’’(एएस १ ) वरील, अकाऊंटिंग स्टँडर्ड १ अनुसार आवश्यक प्रकटीकरणाव्यतिरिक्त, त्या उद्योगाने, लक्षणीय अशक्यतांबाबत निकाल/निर्णय होईपर्यंत महसुलाची ओळख लांबणीवर टाकण्याबाबतची परिस्थितीही प्रकट करावी

### (४.३) अकाऊंटिंग स्टँडर्ड १५ : कर्मचाऱ्यांसाठी लाभ

आयसीएआयने दिलेल्या, ‘‘कर्मचाऱ्यांसाठी लाभ’’(एएस १५ सुधारित ) खाली विहित केलेल्या प्रकटीकरण आवश्यकतांचे अनुपालन बँका करु शकतात

### (४.४) अकाऊंटिंग स्टँडर्ड १७ : सेगमेंट रिपोर्टिंग

वरील लेखा-मानकाचे अनुसरण करत असताना, बँकांनी पुढील बाबींचे अनुसरण करणे आवश्यक आहे

(अ) व्यवसायाचा भाग ( बिझिनेस सेगमेंट ) हा साधारणतः प्राथमिक रिपोर्टिंग फॉरमॅट समजला जावा आणि भौगोलिक विभाग दुय्यम रिपोर्टिंग फॉरमॅट समजला जावा.

(ब) ह्यातील बिझीनेस सेगमेंट्स म्हणजे, ‘‘ट्रेझरी’’, ‘‘कॉर्पोरेट/होलसेल बँकिंग’’, ‘‘रिटेल बँकिंग’’व ‘‘इतर बँकिंग ऑपरेशन्स’’असतील.

(क) ‘‘देशांतर्गत’’व ‘‘आंतरराष्ट्रीय’’सेगमेंट्स हे प्रकटीकरणासाठी भौगोलिक सेगमेंट्स असतील.

(ड) ह्या सेगमेंट्समध्ये खर्च वाटपासाठी, बँकांनी, वाजवी व सातत्यपूर्ण अशा रीती स्वीकाराव्यात.

अकाऊंटिंग स्टॅंडर्ड १७ : सेगमेंट रिपोर्टिंगखाली प्रकटीकरणाचा नमुना

भाग अ – बिझीनेस सेगमेंट्स

(रक्कम रु. कोटींमध्ये)

| बिझिनेस सेगमेंट्स | ट्रेझरी | | कॉर्पोरेट/होलसेल बँकिंग | | रिटेल बँकिंग | | इतर बँकिंग व्यवहार | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तपशील | विद्यमान वर्ष | मागील वर्ष | विद्यमान वर्ष | मागील वर्ष | विद्यमान वर्ष | मागील वर्ष | विद्यमान वर्ष | मागील वर्ष | विद्यमान वर्ष | मागील वर्ष |
| परिणाम | | | | | | | | | | |
| ॲलोकेट न केलेला खर्च | | | | | | | | | | |
| कार्यकारी नफा | | | | | | | | | | |
| आयकर | | | | | | | | | | |
| अतिविशेष नफा/तोटा | | | | | | | | | | |
| निव्वळ नफा | | | | | | | | | | |
| इतर माहिती | | | | | | | | | | |
| सेगमेंट ॲसेट्स | | | | | | | | | | |
| ॲलोकेट न केलेले ॲसेट | | | | | | | | | | |
| एकूण ॲसेट | | | | | | | | | | |
